# हेड शेव्हिंग पार्टी

नीलिमा कुलकर्णी
क्लार्क्सबर्ग, न्यूजर्सी



विमानप्रवासात विमानाची गती जाणवू नये इतक्या अलगदपणे विमान पुढे सरकत असतं आणि अचानक खड्ड्यात पडल्यासारखं विमान हादरतं. तसं माझं आज झालं. फोन वाजला. फोनवर 'राजश्री कुलकर्णी' हे नाव दिसलं आणि फोन उचलायच्या आधीच नेहमीच्या अनुभवाने माझ्या चेहऱ्यावर हसू उमटलं पण...

राजश्री कुलकर्णी म्हणजे सकारात्मक, पॉझिटीव्ह शक्तीचा स्रोत! ही माझी माझ्यापेक्षा २० वर्षांनी लहान मैत्रीण! रक्ताचं नातं नसलं तरी रक्ताच्या नात्यापेक्षा जवळचं असं निवडलेलं नातं 'मावशी' म्हणून तिने जोडलं आहे. नॉर्मल जगाच्या बाहेर धाडस करणारी राजश्री, उत्तम प्रकृती, उदंड उत्साह, "happy and healthy" चं प्रतिक असणारी राजश्री! न्यू जर्सीतच नव्हे तर उत्तर अमेरिकेतही अनेकांना परिचित असलेली. कोणाला तिच्या बृहन्महाराष्ट्रवृत्तातील पंढरीच्या वारीच्या लेखांमुळे माहिती असेल, तर कोणाला मॅरेथॉन रनर म्हणून! तिच्याकडून सतत काहीतरी वेगळं ऐकायला मिळतं. कधी सांगते, स्काय डायव्हिंग करून आली तर कधी वारी! चाळीशी उलटल्यावर मॅरेथॉन धावण्याचे रीतसर ट्रेनिंग घेऊन १२ हाफ मॅरेथॉन आणि नुकतीच न्यू यॉर्कची सुप्रसिध्द २६.२ मैलाची मॅरेथॉन तिने पूर्ण केली. काही वर्षांपूर्वी तिने भारतात जाऊन वारकरी लोकांबरोबर पायी चालून १८ दिवसात २६० किमी ची पंढरीची वारी केली. मध्यम वयाच्याच काय, पण तरूण

मुलींना लाजवेल अशा तिच्या ह्या physical activities. शिवाय सांस्कृतिक कार्यक्रमांचे संचलन, ‘hidden gems’ या संस्थेच्या कामात सतत पुढाकार घेऊन केलेले कार्यक्रम, मराठी विश्वच्या ‘रंगदीप’ मासिकाचे एका वर्षी संपादन आणि नंतर सातत्याने केलेले संपादन सहाय्य अशा अनेक गोष्टी सुरु असतात. मराठी विश्वच्या ढोल-ताशा पथकात नाचायला राजश्री पुढेच असणार. अशी ही हरहुन्नरी, हौशी, आनंदी राजश्री. आता आणखी काहीतरी नवीन ऐकायला मिळणार म्हणून मी उत्सुकतेने फोन घेतला.

पण आजचा कॉल एका वेगळ्याच मूडमध्ये सुरु झाला. “मावशी, माझा मॅमोग्राम पॉझिटीव्ह आलाय, बाकीही टेस्ट झाल्या. मला ब्रेस्ट कॅन्सर झालाय.” राजश्री सांगत होती, मी शक्य तेव्हढं शांत राहायचा प्रयत्न करीत, काळजी करू नकोस, हा बरा होणारा कॅन्सर आहे, आणि माझ्या ओळखीच्या कॅन्सर झालेल्यांची यादी सांगत, राजश्रीची बातमी पचविण्याचा प्रयत्न करीत होते. इतक्या उत्तम प्रकृतीच्या व्यक्तीला असं कसं होऊ शकतं, याचा किडा मनात वळवळत होता.

तिला कॅन्सर झाला ही बातमी खरोखरच धक्कादायक होती. तो कोणालाही होऊ शकतो याची आता खात्री पटली. मी माहिती काढू लागले. स्टॅटीस्टिक धक्का देणारे आहेत. अमेरीकेत दर ८ स्त्रियांमागे १ स्त्री ला ब्रेस्ट कॅन्सर होतो. २०१७ मध्ये २,५२,७१० केसेस होत्या. हा फक्त स्त्रियांनाच होतो असे नाही. गेल्या वर्षी २४०० पुरुषही याचे बळी ठरले आहेत. १९८९ पासून ब्रेस्ट कॅन्सरने मृत्यू येण्याचे प्रमाण दरवर्षी कमीच होत असले, तरी गेल्या वर्षी जवळजवळ ४०,००० स्त्रियांनी आपले प्राण गमावले आहेत. **आपल्या कुटुंबात कोणाला पूर्वी कॅन्सर झाला असेल, (family history असेल ) तर तुम्हाला असण्याची, होण्याची शक्यता दुप्पट होते. प्रत्येक स्त्रीने वयाच्या ४० व्या वर्षी व ४५ नंतर दरवर्षी मॅमोग्राम काढून घ्यायला पाहिजे अशी अमेरिकन कॅन्सर असोसिएशनची सूचना आहे. जितक्या लवकर डिटेक्ट झाला तितकी तो बरा होण्याची शक्यता वाढत जाते. ४० वर्षाच्या आधी, घरीच एखादी गाठ असेल का हे चाचपडून पहाण्याची “सेल्फ टेस्ट” पण करायलाच पाहिजे.**

राजश्रीचा ४५ व्या वर्षीचा मॅमोग्राम नॉर्मल होता, आता ४७ व्या वर्षी गाठ, आणि लिम्फनोडमध्येही प्रादुर्भाव दिसत होता. कॅन्सर दुसऱ्या स्टेजमध्ये आहे. किमोथेरपीचे ८ सेशन्स, नंतर ऑपरेशन आणि रेडिएशन अशी ट्रीटमेंट ठरली आहे. पहिल्या किमोथेरपीनंतर राजश्रीचा टेक्स्ट आला.

"२२ डिसेंबरला मी 'हेड शेव्हिंग पार्टी' ठेवली आहे. YWCA, Princeton च्या ब्रेस्ट कॅन्सर रिसोर्स सेंटरमध्ये दुपारी 3 वाजता जरूर या."
"बापरे, हे काय गं?" मी तिला फोनने विचारलं.
"दुसऱ्या किमोनंतर केस जातात. जाणार तर आहेतच But, I want it to happen, the way I want. फेसबुकवर माझा शेव्हिंग केलेला फोटो पाहून २-४ जणींना जरी मॅमोग्राम काढून बघावासा वाटला तरी ही पार्टी यशस्वी झाली, असं मला वाटेल. Awareness यायला पाहिजे." इति राजश्री.


मला तिचं कौतुक वाटलं. कॅन्सर झाल्याचं कळल्यावर ती रडत बसली नाही. मलाच का सोसावं लागतं म्हणून निराश झाली नाही. यातून मला काहीतरी समाजकार्य करण्याची संधी मिळणार, असा तिचा विश्वास आहे. इलाज सुरु केलेत आणि त्यातून आलेल्या संकटांना धैर्याने तोंड देते आहे. 'हेड शेव्हिंग' या प्रकाराची माहिती काढण्यासाठी मी 'गुगल' गुरूची मदत घेतली.

दुसऱ्या किमोनंतर केस गळायला सुरवात होते, म्हणजे पुंजकेच्या पुंजके उशीवर, बाथरूममध्ये , घरभर पडत असतात. कधीकधी एखादा झुपका मुळापासून सुटून आपल्या हातात येतो, तर कधी उशीवर गंगावन पडावं तसं केस तिथे आणि डोक्याचा एखादा भाग पूर्ण रिकामा झालेला असतो. कॅन्सरच्या दिव्यातून जात असताना केसगळणीमुळे डिप्रेशनमध्ये भर पडते. यातून हेड शेव्हिंग पार्टीची कल्पना जन्माला आली.

'कॅन्सरने तुमचे केस हिसकावून घेण्याआधी तुम्ही धैर्याने सामोरे जा आणि आधीच केस काढून मुंडन करा.' २००५ मध्ये सेंट बाल्डरिक्स या संस्थेने कॅन्सर झालेल्या लहान मुलांसाठी अशा पार्ट्या करायला सुरवात केली. पार्टीला आलेले आईवडील, कधी कधी पूर्ण कुटुंब तर कधी सगळी मित्रमंडळी पेशंटला सपोर्ट म्हणून हेड शेव्हिंग करतात. काही सहृदयी लोक कॅन्सर रिसर्चसाठी पैसे उभारण्यासाठी हेड शेव्हिंग पार्टी करतात. केटलीन या दहा वर्षाच्या मुलीने फंड रेझिंग साठी मुंडन केले आणि ७ हजार डॉलर्स जमवले.

२००५ पासून आजपर्यंत केटलीन सारखी धाडसी मुलं, स्त्रिया, पुरुष - हजारो लोक त्यात सामील झाले आहेत. सेंट बाल्डरिक्स या एकाच संस्थेने हेड शेव्हिंग च्या उपक्रमातून २३२ मिलियन डॉलर्स जमा केले आहेत. न्यूजर्सीत २०१५ मध्ये YWCA यासंस्थेच्या ब्रेस्ट कॅन्सर रिसर्च सेंटरने अशा पार्ट्या आयोजित करायला सुरवात केली. त्यातून बऱ्या झालेल्या स्त्रिया तिथे व्हॉलेंटीयर म्हणून काम करतात.

प्रिन्सटनमधील रिसोर्स सेन्टरच्या छोटेखानी इमारतीत ही पार्टी होती. बाहेरच्या वऱ्हांड्यातील खांबांना मोठमोठे गुलाबी रिबन्सचे (ब्रेस्ट कॅन्सरचे प्रतिक) बो बांधले होते. मी आत गेले. टेबलावर सुंदर डेकोरेट केलेल्या गुलाबी कपकेक्स आणि पिंक शॅम्पेन ठेवली होती. तिथे 'रेने' नावाची एक कॅन्सर सर्व्हायव्हर Support Coordinator म्हणून काम करते.



तीन वाजताच्या सुमारास, राजश्रीच्या काही मैत्रिणी गुलाबी, पांढरे बलून्स घेऊन आल्या. आता 'पार्टी' वाटायला लागली. नंतर राजश्री, तिचा नवरा राजेश, मुलगा कौस्तुभ आणि बहीण आले. गुलाबी/ऑफ व्हाईट रंगांचे फॅशनेबल कपडे घालून, नेहमीसारखी मस्त तयार होऊन आलेली राजश्री, पार्टीची खऱ्या अर्थाने उत्साहमूर्ती बनून आली. आल्या आल्या प्रत्येकीबरोबर फोटो काढण्याचा कार्यक्रम झाला. तिच्या बहिणीने सर्वांना घरी तयार केलेल्या गुलाबी रिबन्सचे बो दिले. नेहमीप्रमाणे गप्पा गोष्टी, चेष्टा मस्करी सुरु होती. राजश्री हेअरकटच्या चेअरवर बसली. "कोणाला काही बोलायचंय का?" राजेशने विचारल्यावर ५-६ जणींनी राजश्रीच्या धैर्याचं, सौंदर्याचं, तिच्या सकारात्मक स्वभावाचं आणि सतत काही ना काही नवीन उपक्रम करत राहण्याच्या वृत्तीचं कौतुक केलं. हसणाऱ्या चेहऱ्यामागे लपवलेले अश्रू अबोलपणे त्यांचं अस्तित्व जाणवून देत होते. पण 'पार्टी' मूड कायम ठेवण्याचा निर्धार प्रत्येकीच्या मनात होता.

हेअरकट सुरु झाला, आधी एका बाजूने कापून फोटो काढला. मग 'मोहॉक' सारखे फक्त मध्ये केस ठेऊन तो फोटो, नंतर पूर्ण केस काढल्यावर फोटो. प्रत्येक पायरीवर मुळात सुंदर

असणारी राजश्री आणखीनच सुंदर दिसत होती. आत्मविश्वासाचं तेज तिच्या डोळ्यात चमकत होतं. फोटो झाल्यावर राजश्रीने मचिंग स्कार्फ फेट्यासारखा बांधला. पुन्हा फोटोज्.



राजश्रीच्या पार्टीत तिचा मेडिकलला असणारा मुलगा कौस्तुभ यानेही मुंडन केले. दोघेही सुंदर दिसत होते. एका कॅन्सरमुक्त स्त्रीने लिहिले आहे, "हेड शेव्हिंग केल्यावर माझ्या लक्षात आलं, हे केस म्हणजे मी नाही, मी म्हणजे बाह्यसौंदर्यापेक्षा बरंच काही आहे. हेड शेव्हिंगने मला अंतर्मुख व्हायला शिकवलं."

कॅन्सर म्हणजे 'the emperor of all maladies' - सर्व दु:खांचा सम्राट. त्याच्याशी झुंज घेणारी ही झांशीची राणी! या संघर्षात तिला जिंकायचं आहे. किमोथेरपी, त्यानंतर कमी झालेला WBC Count वाढवण्यासाठी घेतलेल्या 'न्यूलास्टा'चे साईड इफेक्ट्स - मळमळ, ॲसिडिटी, अतिप्रचंड थकवा, माऊथ अल्सर/तोंड येणे, घशाला कोरड पडणे, हाडं दुखणे, हात सुजणे, डायरिया किंवा कॉन्स्टिपेशन, चक्कर येणे ... ते सहन करतकरत इंचाइंचाने पुढे सरकायचं आहे. या काही लढाया "तो" जिंकेल, पण निदान केसांची लढाई आज तिने जिंकली होती. जणू काय 'उदंड अमुची इच्छाशक्ती, अनंत अमुच्या आशा...' म्हणत ती उभी होती. अंतिम विजय तिचा आहे, तिला बरं व्हायचं आहे... !

हेड शेव्हिंग पार्टीचे तेच यश आहे. ही कथा आहे जिद्दीने पुढे जाण्याची, खूप शिकण्याची, इतरांना शिकवण्याची आणि अंतर्मुख होण्याचीही!

(पूर्वप्रसिद्धी : 'लोकसत्ता')